| | |
|---|---|
| MHKO140001842026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२१/२०२६**<br><br>अपुर्वा लक्ष्मीकांत तुपारे<br>**वि.**<br>महाराष्ट्र सरकार तर्फे, विशेष सरकारी वकील, चंदगड ता. चंदगड, जि. कोल्हापूर |

**निशाणी क्र.१ खालील आदेश**
**(दिनांक–१३/०३/२०२६)**

१. प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा सहिंता, २०२३ चे कलम ४९७ अन्वये दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी ऑनलाईन खरेदी संबंधी फसवणुकीबाबत राष्ट्रीय सायबर गुन्हा रिपोर्टींग पोर्टल येथे तक्रार केलेली आहे. पोलिस ठाणे यांचे सांगण्याप्रमाणे त्यांनी सायबर क्राईम पोर्टल येथे अ◌ॅकनॉलेजमेंट नं.३१९०२२६००४३४८२, दिनांक २५/०२/२०२६ रोजी तक्रार नोंदविलेली आहे. अर्जदार यांची एकूण रक्कम रु.५०,५८०/– ची फसवणुक झालेली आहे आणि त्यापैकी रक्कम रु.५०,५८०/– इतकी रक्कम सायबर शाखेच्या अधिकारी यांनी Bandhan Bank, Axis Bank, Catholic Syarian Bank, Kotak Mahaindra Bank, Indusland Bank येथे रक्कम रु.५०,५८०/– गोठवलेले आहे. सबब. सदर रक्कम ही चंदगड पोलिस ठाणे मार्फत सायबर गुन्हे शाखा, कोल्हापूर यांनी गुन्हयाच्या कामी जप्त केलेली आहे. सदर रक्कम अर्जदार यांना मिळणे आवश्यक आहे. करिता प्रस्तुतचा अर्ज.

३. सरकापक्षातर्फे सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि तपासी अधिकारी यांनी या प्रकरणामध्ये म्हणणे दाखल केलेले नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जासोबत अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदाराच्या कथनावरुन असे दिसून येते की, अर्जदार यांनी सायबर क्राईम पोर्टलवर त्यांच्यासोबत खरेदीबाबत आर्थिक गैरव्यवहार झालेबाबतची तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रार अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. तसेच सदर तक्रार अर्जाची प्रत अर्जदार यांनी दाखल केलेली आहे. अर्जदार

यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, सदर तक्रारीच्या अनुशंगाने अर्जदार यांच्याकडून झालेल्या आर्थिक व्यवहाराबाबत नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टलमध्ये मनी ट्रेल असुन त्यामध्ये पोर्टलमधील संबंधीत नोडल अधिकारी यांनी अर्जदार यांचे व्यवहाराबाबत रक्कम ही आरोपीच्या खात्यामध्ये होल्ड करुन ठेवलेली आहे. सदर कथनास गैरअर्जदार यांनी म्हणणे दाखल करुन हरकत घेतलेली नाही. सदर रक्कम ही अर्जदार यांची असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदर रक्कम अर्जदारास योग्य अटी व शर्तीवर देणे आवश्यक आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) पोलिस निरीक्षक, सायबर पोलिस ठाणे, कोल्हापूर यांनी अर्जदार यांचे व्यवहारातील आरोपीचे खात्यामध्ये होल्ड करुन ठेवलेली रक्कम रु.५०,५८०/- ही अर्जदार यांना बॅंक ऑफ इंडिया, शाखा-गडहिंग्लज, बचत खाते नं.०९२६१८२१०००६९५१ या खात्यावर जमा करणेबाबत संबंधीत बॅकेस कळवावे.

३) अर्जदार यांनी रक्कम रुपये ५०,०००/- चा सुपूर्तनामा हमीपत्र/ indemnity bond हा ५०० रूपयाच्या स्टॅंप + पेपरवर लिहून द्यावा.

सही/-

दिनांक : १३/०३/२०२६
चंदगड

(वामन दि.जाधव)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (कोर्ट क्र.२)
चंदगड.